# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 18-11-2022

नागपूर(महाराष्ट्र) मध्ये नागपूर ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2022-11-18 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2022-11-19 | 2022-11-20 | 2022-11-21 | 2022-11-22 | 2022-11-23 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 31.3 | 31.0 | 30.7 | 30.5 | 30.3 |
| किमान तापमान (अं.से) | 14.1 | 13.8 | 13.5 | 13.0 | 12.7 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 67 | 64 | 61 | 58 | 56 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 57 | 55 | 53 | 51 | 49 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 2.0 | 2.0 | 1.0 | 1.0 | 1.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 28 | 18 | 22 | 19 | 18 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 3 | 7 | 8 | 4 | 2 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• नागपुर तालुक्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक १९ ते २३ नोव्हेंबर, २०२२ दरम्यान आकाश निरभ्र ते आंशिक ढगाळ व हवामान कोरडे राहण्याची अधिकशक्यता वर्तविण्यात आली आहे. • अंदाजाची वैधता- नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत.

## कृषि सल्ला:

• परिपक्व अवस्थेतील धान पिकाची कापणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. • कपाशीमधील दहिया रोग व पानावरील ठिपके रोगाच्या व्यवस्थापनासाठी अझॉक्सिस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी१० मिली किंवा क्रेसॉक्सिम-मिथाइल ४४.३ एसस १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • वाणानुसार वेचणी केलेला कापूस कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

• परिपक्व अवस्थेतील धान पिकाची कापणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| गहू | • गहू बियाण्यास पेरणीपूर्वी अॅझोटोबॅक्टर हे नत्र स्थिरीकरण करणारे जीवाणू संवर्धन आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू खत प्रत्येकी २५० ग्राम प्रती १० ते १२ किलो बियाण्यास लावून बीजप्रक्रिया करावी. • गहू पिकामध्ये बुरशीजन्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पेरणीपूर्वी गव्हाच्या बियाण्याला बीजप्रक्रिया करावी, यासाठी शिफारस केलेले बुरशीनाशक आणि कीटकनाशके पुढीलप्रमाणे आहेत. बंट (Bunt), ध्वज काणी (Flag smut) आणि मोकळी काणी (Loose smut) रोगाचे व्यवस्थापन करण्यासाठी कार्बोक्सिन 75 % डब्ल्यूपी @ 2-2.5 ग्रॅम/किलो बियाणे किंवा मोकळी काणी (Loose smut) रोगाचे व्यवस्थापन करण्यासाठी डायफेनोकोनाझोल ३ %डब्ल्यूएस @ २ ग्राम प्रती किलो बियाणे किंवा ध्वज काणी (Flag smut) आणि मोकळी काणी (Loose smut) रोगाच्या व्यवस्थापनासाठी टेब्युकोनाझोल ५.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एफएस @ ०.३ मिली प्रती किलो बियाणे किंवा मोकळी काणी (Loose smut) रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बोक्सिलन ३७.५ % + थायरम ३७.५ % डब्ल्यूएस @ ३ ग्राम प्रती किलो बियाणे किंवा तांबेरा व काणी रोग तसेच वाळवी आणि मावा किडीच्या प्रादुर्भावाचे व्यवस्थापन करण्यासाठी इमिडाक्लोप्रिड १८.५ % + हेक्साकोनाझोल १.५ % एफएस @ ३ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बीज प्रक्रिया करावी. |
| गहू | • गहू पिकास पेरणीनंतर १८ ते २० दिवसानंतर मुकुट मुळे फुटण्याच्या अवस्थेत पहिले पाणी द्यावे. या अवस्थेत पाण्याचा ताण बसल्यास ३३ टक्के पर्यंत उत्पादनात घट येऊ शकते. बागायती उशिरा गहू पेरणीसाठी प्रती हेक्टरी १५० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे. गहू पिकाच्या एचडी २१८९ किंवा पूर्णा यासारख्या जाड दाण्यांच्या वाणांसाठी बियाणे दर प्रती हेक्टरी १२५ किलो वापरावे.बागायती उशिरा पेरणीसाठी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश या प्रमाणात रासायनिक खतांची मात्रा द्यावी. बागायती वेळेवर आणि उशिरा या दोन्ही पेरणीसाठी नत्राची अर्धी मात्रा तसेच संपूर्ण स्फुरद आणि पालाश पेरणीच्या वेळी द्यावे व उरलेली नत्राची अर्धी मात्रा पहिल्या पाण्याचे पाळीच्या वेळी (१८ ते २० दिवसानंतर) द्यावी. |
| सूर्यफूल | • सूर्यफूल पिकामध्ये उगवणीनंतर १० ते १५ दिवसांनी विरळणी करावी आणि एका ठिकाणी एकाच जोमदार रोपटे ठेवावे. |
| भात | • शेतकऱ्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी परिपक्व झालेल्या धान पिकाची कापणीकरावी. कापलेला धान पिक २ – ३ दिवस उन्हात वाळू द्यावे व वाळल्यानंतर पेंढ्या बांधून मळणीस खळ्यावर रचून ठेवावे व मळणी करावी. • धान पिकाची कापणी ही जमीनीलगत करावी जेणेकरुन खोडकिडीची सुप्तावस्था नष्ट होऊन उन्हाळी धान पिकात या किडीचा प्रादुर्भाव कमी होइल. • काजळी / काणी / आभासमय काजळीग्रस्त लोंब्या अलगत काढुन खोल खड्ड्यात पुराव्यात किंवा जाळुन नष्ट कराव्यात जेणेकरुन हा रोग इतरत्र पसरणार नाही. |
| कपाशी | • कापसाच्या स्वच्छ वेचणीला प्राधान्य द्यावे. वेचणी केलेला कापूस वाण परत्वे वेगळा ठेवावा. • कपाशीमध्ये रस शोषक किडीच्या प्रादुर्भावाकडे लक्ष द्यावे, रस शोषक किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त दिसून आल्यास, नियंत्रणासाठी फ्लॉनिकॅमिड ५० डब्ल्यूजी @ ८० ग्रॅम प्रती एकर किंवा डायनोटेफ्युरोन २० एसजी @ ६० ग्रॅम प्रती एकर किंवा थायमेथॉक्झाम २५ डब्ल्यूजी @ ४० ग्रॅम/एकर प्रमाणात किटकनाशकाची स्वच्छ हवामान असताना व वाफसा परिस्थितीत असताना करावी. • गुलाबी बोंडअळीचे निरीक्षण करण्यासाठी, शेतात २कामगंध सापळे प्रती एकर लावावे. गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भावआर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास सायपरमेथ्रिन १० ईसी @ १० मिली किंवा फेनव्हॅलेरेट २० ईसी @ १० मिली किंवाडेल्टामेथ्रिन २.८ ईसी @ १० मिली किंवाअल्फा-मेथ्रीन १०ईसी @ १० मिली किंवाबीटा सायफ्लुथ्रीन २.५ ईसी @ १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. गुलाबी बोंड अळी व्यवस्थापनासाठी ट्रायकोग्रामा अंडी १.५ लाख प्रती हेक्टर या प्रमाणात वापर करावा. |
| कपाशी | • कपाशीमधील दहिया रोग व्यवस्थापनासाठी अझॉक्सिस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी१० मिली किंवा क्रेसॉक्सिम-मिथाइल ४४.३ एसस १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • काही भागात पानांवर व पात्यांवर कोरीनेस्पोरा बुरशीचा संसर्ग दिसत आहे. व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझिम ५० डब्लू. पी. १ मिली प्रति लिटर किंवा (मेटीराम ५५%+पायराक्लोस्ट्रॉबीन ५% डब्लू.जी.) २ ग्रॅम प्रति लिटर किंवा प्रोपीकॉनाझोल २५% ई. सी. १ मिली प्रति लिटर किंवा (अझोझायस्ट्रॉबीन १८.२% डब्लू/डब्लू + डायफेनोकोनाझोल ११.४% डब्लू/डब्लू एस.सी.) १ मिली प्रति लिटर किंवा (फ्लूकझापायरोकझाड १६७ ग्रॅम/ली + पायराक्लोस्त्रोबीन ३३३ ग्रॅम/ली एस.सी.) ०.६ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • कपाशीवरील पानावरील ठिपके, बोंड सड व करपा या बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी क्रेसॉक्सिम-मिथाइल ४४.३ एसस १० मिली किंवा प्रोपिनेब ७० डब्ल्यूपी२५ ग्राम किंवा प्रोपिकोनाझोल २५ ईसी१० मिली किंवा मेटीराम ५५% + पायराक्लोस्ट्रोबिन ५ % डब्लूजी २० ग्रॅम किंवा अझॉक्सिस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी१० मिली किंवा फ्ल्यूक्सापायरोक्सॅड १६७ g/l + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ g/l एससी ६ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| वांगे | • वांग्याच्या पिकावर फळे व शेंडा पोखरणाऱ्या अळीचा रादुर्भाव दिसून आल्यास व आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास कार्बोसल्फान २५ % ईसी १२५० मिली प्रति हेक्टर किंवाडेल्टामेथ्रिन ०२.८० % ईसी ४०० ते ५०० मिली प्रति हेक्टर किंवाइमामेक्टिन बेंझोएट ०५ % एसजी २०० ग्रॅम प्रति हेक्टर किंवालॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.९० % सीएस ३०० मिली प्रति हेक्टर किंवास्पिनोसॅड ४५ % एससी १६२ ते १८७ मिली प्रति हेक्टर किंवाथियाक्लोप्रिड २१.७० % एससी ७५० मिली प्रति हेक्टर किंवाक्लोरॉंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी २०० मिली प्रति हेक्टर या प्रमाणात ५०० लिटर पाण्यात मिसळून कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. |
| मिरची | • तापमानातील चढ उतार व उच्च आद्रतेमुळे मिरची पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी हेक्साकोनाझोल ७५ % डब्ल्यूजी६६.७ ग्राम ग्रॅम किंवा टेब्युकोनाझोल २५ % डब्ल्यूजी @ ५००-७५० ग्रॅम किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन ८.३ % + मॅन्कोझेब ६६.७ % डब्ल्यूजी @ १५०० ग्रॅम किंवा बोस्कालीड २५.२ % + पायराक्लोस्ट्रोबिन १२.८ % डब्ल्यूजी @ ६०० ग्राम किंवा कार्बेन्डाझिम १२ % + मॅन्कोझेब ६३ % डब्ल्यूजी @ ७५० ग्रॅम किंवा क्रेसॉक्सिम - मिथाइल १५ % + क्लोरोथॅलोनिल ५६ % डब्ल्यूजी @ १००० ग्रॅम किंवा टेबुकोनाझोल १० % डब्ल्यूपी + सल्फर ६५ % डब्ल्यूजी @ १२५० ग्रॅम किंवा टेबुकोनाझोल ५० % + ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोबिन २५ % डब्ल्यूजी @ २५० ग्राम प्रती हेक्टर ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून या पैकी कोणत्याही एका बुरशी नाशकाची स्वच्छ हवामन परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| संत्रा | • या महिन्यात (मृग बहार – जुन फुलोरा) नागपुरी संत्रा व मोसंबी च्या झाडांना ठिबक किंवा दुहेरी आळे पद्धतीने ओलीत करावे. संत्रा व मोसंबीच्या एक वर्ष पर्यंतच्या झ्इडांना ८ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस, ४ वर्ष वयापर्यंतच्या झाडांना ३६ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस, ८ वर्ष वयापर्यंतच्या झाडांना ८५ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस आणि १० ते २५ वर्ष वयापर्यंतच्या झाडांना १०५ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे. लिम्बुच्या १ वर्ष वयाच्या झाडांना ४ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस तर १० ते २५ वर्ष वयापर्यंतच्या झाडांना ८८ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे. आंबिया बहराच्या परिपक्व फळांची काढणी करावी. आंबिया बहराच्या फळ काढणीस उशीर होत असल्यास १५ दिवसाच्या अंतराने जिबरेलिक आम्ल १५ पीपीएम + १ % युरिया याची दोनदा फवारणी करावी. तन व्यवस्थापन करून बाग स्वच्छ ठेवावी. झाडाच्या बुन्ध्याजावालाची जमीन भुसभुशीत करावी. एक वर्ष वयाच्या झाडांना १०८ ग्राम युरिया आणि ४५ ग्राम म्युरेट ऑफ पोटाश द्यावे. दोन वर्ष वयाच्या झाडांना दुप्पट, तीन वर्ष वयाच्या झाडांना तिप्पट तर चार वर्ष वयाच्या झाडांना चौपट खताची मात्रा द्यावी. खते देतांना नेहमी जमीन हि वाफसा अवस्थेत असल्याची काळजी घ्यावी जेणेकरून पिकास दिलेल्या खताची बचत होईल. बहार असलेल्या फळ बागेतील झाडांना ५०० ग्राम युरिया, ६०० ग्राम सिंगल सुपर फॉस्फेट, १५० ग्राम म्युरेट ऑफ पोटाश, १०० ग्राम फेरस सल्फेट, १०० ग्राम मँगनीज सल्फेट, १०० ग्राम झिंक सल्फेट आणि ५० ग्राम बोराक्स प्रत्येक झाडांना द्यावे. |
| संत्रा | • आंबिया बहार घेण्यासाठी ओलीत थांबवून पाण्याचा ताण द्यावा. फळ काढणीनंतर मृत/जुनाट फांद्या काढून नष्ट कराव्या व त्यानंतर १ टक्के कार्बेन्डाझीम या बुरशीनाशकाची फवारणी करावी. माव्वा किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास डायमिथोएट १.५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड ०.५ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास दुसरी फवारणी या पैकी एका किटकनाशकाची आलटून पालटून १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. कोळी किडीचा प्रादुर्भाव असल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास डायकोफॉल २ मिली किंवा प्रोपारगाईट १ मिली किंवा इथिओन २ मिली किंवा पाण्यात विरघळणारे गंधक ३ ग्राम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास १५ दिवसाच्या अंतराने नमूद किटकनाशक बदलून दुसरी फवारणी करावी. याआधी झाडाच्या बुंध्याला बोर्डेक्स पेस्ट लावली नसल्यास लावावी. चांगल्या प्रतीचे बोर्डेक्स पेस्ट तयार करण्यासाठी एका प्लास्टिकच्या बादलीमध्ये १ किलो कॉपर सल्फेट ५ लिटर पाण्यात मिसळून भिजवावे, दुसऱ्या प्लास्टिकच्या बादलीमध्ये १ किलो चुना ५ लिटर पाण्यात भिजवून रात्रभर भिजवून ठेवावा. दुसऱ्या दिवशी दोन्ही बादल्यातील मिश्रण एकत्र ढवळावे. मिश्रण तयार झाल्यानंतर १२ तासाच्या आत वापरावे. फायटोप्थोरा/डिंक्या ग्रस्त झाडावरील डिंक चाकूच्या सहाय्याने खरडून घ्यावा व मेफेनोक्झाम एमझेड किंवा फॉसीटील एएल आम्लाची पेस्ट लावावी. |

**पशुधन विषयक निहाय सल्ला:**

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| म्हैस | • जनावरांसाठी पोषक चारा उपलब्धतेसाठी लुसर्न आणि बरसीम या चारा पिकाची लागवड करावी. जनावरांचा गोठा हा स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवा. जंतनाशकाची मात्रा ३महिन्यांच्या आधी केली नसल्यास जनावरांना जंतनाशकाची मात्रा द्यावी. गोठ्याचे निर्जंतुकीकरण २ टक्के फार्मेलिन चे द्रावण तयार करून करावी. जनावरांमध्ये अतिसारआणि अपचन टाळण्यासाठी लहान आणि मोठ्या जनावरांना कोरडा चाऱ्याचा आहारात समावेश करावा. चारा पिकासाठी शिफारस केलेली रासायनिक खतांची मात्रा द्यावी. |

**इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:**

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • रोपवाटीकेतील वांगी, टोमाटो, फुलकोबी व पानकोबीचे ४ ते ६ आठवडे वयाची रोपांची शेतात लागवड करावी. मेथी, पालक, कोथिंबीर, मुळा व गाजर याची टप्प्याटप्प्याने लागवड करावी. |
| सामान्य सल्ला | • हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. |